**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स कॅपोविटेझ प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. इ-१/५अ, १/५ब, बारामती औद्योगिक क्षेत्र, तांदुळवाडी, तालुका-बारामती, जिल्हा-पुणे, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित नवीन इथेनॉल/ईएनएची उत्पादन क्षमता १०५.० किलोलिटर प्रति दिन (धान्यावर आधारित), १०.० किलो लिटर प्रती दिन (माल्ट), सहवीज निर्मिती प्रकल्प - ४.० मेगावॅट (कॅप्टिव्ह जनरेशन), ५.० टन प्रती दिन कॉर्न ऑईल प्रकल्प आणि ७५.० टन प्रति कार्बन-डाय-ऑक्साईड व डीडीजीएसच्या ८०.० टन प्रति दिन उप-उत्पादनाच्या प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

---

श्री. प्रताप जगताप, उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा समन्वयक पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. हिम्मत खराडे, अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री नितीन शिंदे, प्रभारी प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, जनसुनावणीस उपस्थित असलेले नागरीक, उदयोगांचे प्रतिनिधी यांचे स्वागत करुन अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक यांनी सांगितले कोविड-१९ संसर्गजन्य साथीच्या पार्श्वभूमीवर सदरहू जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी पारित केलेल्या निर्देशांनुसार पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून त्याचे उपस्थित असलेल्या सर्वांनी पालन करण्याची सूचना केली. समन्वयक पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मेसर्स कॅपोविटेझ प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. इ-१/५अ, १/५ब, बारामती औद्योगिक क्षेत्र, तांदुळवाडी, तालुका-बारामती, जिल्हा-पुणे, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित नवीन इथेनॉल/ईएनएची उत्पादन क्षमता १०५.० किलोलिटर प्रति दिन (धान्यावर आधारित), १०.० किलो लिटर प्रती दिन (माल्ट), सहवीज निर्मिती प्रकल्प - ४.० मेगावॅट (कॅप्टिव्ह जनरेशन), ५.० टन प्रती दिन कॉर्न ऑईल प्रकल्प आणि ७५.० टन प्रति कार्बन-डाय-ऑक्साईड व डीडीजीएसच्या ८०.० टन प्रति दिन उप-उत्पादनाच्या प्रकल्प उभारणीयस दिनांक ३१-१२-२०१९ रोजी पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, राज्य प्रभाव आकलन प्राधिकरणच्या २२८ व्या बैठकीत Terms of Reference (TOR) मंजूर करण्यात आला. त्यानुसार प्रकल्प प्रवर्तकांने ड्राफ्ट पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करुन भारत सरकारच्या पर्यावरण, वने व जल वायू परिवर्तन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार दिनांक ०८-०९-२०२१ रोजी जनसुनावणी आयोजित करण्यासाठी म.प्र.नि मंडळाकडे अर्ज सादर केला. सदर प्रकल्पाची जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आज दिनांक २६-१०-२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता असल्याची जाहिर सूचना दिनांक १६-०९-२०२१ च्या स्थानिक वृत्तपत्र लोकसत्ता यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यात प्रस्तावित प्रकल्पाविषयी

पर्यावरणीय सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप जनतेस, पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या संस्था यांना करण्यात आलेले होते.

तसेच या प्रकल्पाचे दस्तावेज म्हणजे पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत जनतेच्या अवलोकनार्थ शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर - ४४० ००१, मा. जिल्हाधिकारी कार्यालय-पुणे, मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद, पुणे, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, पुणे, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, मुंबई, प्रादेशिक कार्यालय ,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ पुणे, उप प्रादेशिक कार्यालय पुणे -१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संकेत स्थळ, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, बारामती, जिल्हा-पुणे, तहसीलदार, तहसील कार्यालय-बारामती,जिल्हा-पुणे, उप विभागीय अधिकारी, तहसील बारामती, जिल्हा-पुणे, मुख्याधिकारी, बारामती नगरपरिषद, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बारामती, जिल्हा-पुणे, ग्रामपंचायत कार्यालये - सावळ, वंजारवाडी,गोजुबाई,कठफळ, उंडवडी, कठेपठार, तालुका-बारामती येथे उपलब्ध आहेत असे कळविले होते. जाहिर सूचनेनंतर म.प्र.नि. मंडळास एक सूचना ईमेलव्दारे प्राप्त झालेली आहे.

ही जाहिर जनसुनावणी गठित समितीचा आदेश क्र. ई-९१/२०२१ पत्र क्रं. बीओ/जेडी (ड्ब्ल्युपीसी)/ पीएच/बी-२११०१३-एफटीएस-००५४, दि. १३-१०-२०२१ व्दारे मंडळाच्या सदस्य सचिवांनी निर्गमित केलेला असून खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, पुणे - **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) प्रादेशिक अधिकारी, - **सदस्य**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी,पुणे-१ - **समन्वयक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे

प्रस्तावित प्रकल्पाविषयी लेखी सूचना द्यावच्या असल्यास त्या म.प्र.नि.मंडळाच्या प्रतिनिधीकडे देण्यात याव्यात. त्या अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना सादर करता येतील. ज्यांना तोंडी प्रश्न विचारायचे असतील, त्यांनी सादरीकरणानंतर आपले नांव व गाव स्पष्टपणे सांगून मांडावेत. प्रकल्प प्रवर्तक त्या प्रश्नांची उत्तरे देतील. सदरहू बैठकीचे व्हिडीओ रेकॉर्डिग करण्यात येत आहे. सदरहू बैठकीचे इतिवृत्त तयार करण्यात येऊन ते म.प्र.नि.मंडळाच्या मुख्यालयात पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना सादर करण्यात येईल. ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून कोणताही निर्णय वा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. सदरहू सूचना/आक्षेप यांची इतिवृतान्तात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे बैठकीत उपस्थित झालेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकास सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण विभागास सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याची सूचना केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत माहिती दिली.

त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पात पर्यावरण व्यवस्थापनासाठी एकूण भांडवली गुंतवणूक रुपये ३७७.५ लाख आहे. तर कारखान्यासाठी आवर्ती खर्च रुपये २७.० लाख एवढा प्रती वर्षी आहे.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आले.

**खालील व्यक्तींनी चर्चेत भाग घेतला व त्यास पर्यावरण सल्लागार/प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरणविषयक जनसुनावणी यांनी दिलेली उत्तरेः-**

**१) श्री. सचिन वस्ते, राहणार-तांदुळवाडी,तालुका-बारामती,जिल्हा-पुणेः-**

| अनु.क्र. | प्रश्न/सूचना/आक्षेप | उत्तर |
|---|---|---|
| अ) | हा प्रकल्प धान्यावर आधारित (Grain Based) आहे. तर ग्रेन बेस्ड व मोलॅसिस बेस्ड प्रकल्पात काय फरक असतो? | प्रकल्प सल्लागार यांनी उत्तर दिले की ऊस उत्पादनातुन निर्माण होणा-या मोलॅसिसिवर आधारित प्रकल्पात निर्माण होणार स्पेंट वॉश हा एसिडिक असून त्यात एक प्रकारचा दर्प असतो.तसेच त्यावर पुढील प्रक्रिया करणे खर्चीक असते. मका किंवा तांदुळ धान्यावर आधारित प्रकल्पात निर्माण होणारा स्पेंट वॉशमध्ये प्रोटीनचे प्रमाण भरपूर असते व त्यातील काही घटके ही पशूखाद्य म्हणून वापरता येतात. |
| ब) | मोलॅसिसमधून दुर्गंधी पसरते, तर धान्यावर आधारित प्रकल्पात येते का? | प्रकल्पात प्रक्रिया करताना सगळीकडे Closed Loop System असल्यामुळे दुर्गंधी येणार नाही.पूर्वी open system असल्याने अन्न कुजल्यावर वास येत असे.व मोलॅसिसचा स्पेंट वॉश जाळवा लागत असे. |
| क) | प्रस्तावित आसवणी प्रकल्पात कच्चा माल म्हणून लागणारा मका ही स्थानिक शेतक-यांकडून घेण्यात येणार किंवा बाहेरुन घेण्यात येणार? | हा कारखाना स्थानिक शेतक-यांसाठीच आहे. प्रकल्पात २५०.० टन मका दरदिवशी लागणार आहे. स्थानिक शेतक-यांचे पीक घेण्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल. |

२) **श्री. अभिजित डवण, राहणार-घाडगेवस्ती, तालुका-बारामती, जिल्हा पुणे**

| अनु.क्र. | प्रश्न/सूचना/आक्षेप | उत्तर |
|---|---|---|
| १) | प्रकल्पात झाडे लावण्यात येतील का? | प्रकल्प सल्लागार यांनी उत्तर दिले की या प्रकल्पाचे एकूण क्षेत्र हे ७.९४ आहे. हरित पट्टा विकसन हे २.६२ हेक्टरवर करणार आहोत. त्यावर सुमारे ३,७९० स्थानिक प्रजातींची झाडे लावणार आहोत. |

३) **श्री.सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, अध्यक्ष, धरित्री पर्यावरण परिरक्षणा संस्था, शिवाजीनगर, नालगोंडा जिल्हा, तेलंगण राज्यः-**

श्री सुनंदा रेड्डी यांनी प्रकल्प प्रवर्तकांचे विस्तारीकरण हाती घेतल्याबद्दल अभिनंदन करुन प्रकल्पास पाठिंबा दिला. त्यांनी सांगितले की बेकारी हे सर्वात जास्त सामाजिक प्रदूषण आहे. बेरोजगारांना नोकरीची संधी मिळणे गरजेचे आहे. श्री. रेड्डी यानी मत मांडले की हा प्रकल्प एमआयडीसीमध्ये असल्या कारणामुळे व प्रकल्प धान्यावर आधारित असल्याने सदरहू प्रकल्प हा "किसान मैत्री प्रकल्प" आहे. ग्रेन बेस्ड इथेनॉल प्रकल्प प्रदूषणकारी नाहीत. मी जनसुनावणी समितीस विनंती करतो की सदरहू प्रकल्पास विनाअट त्वरित मान्यता देण्याची विनंती केंद्र शासनास करावी.

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरणाचे पाणी, जमिन, हवा यांचे योग्य प्रकारे सर्वेषण केले असून त्याचप्रमाणे प्रकल्पाच्या १० कि. मी. परिघातील आरोग्य, पीकउत्पादन, भूजल व शैक्षणिक या बाबत ही सर्वेषण करण्यात यावे.

त्यांनी सांगितले की प्रकल्पात १० एकर जमीन आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी १० कि.मी. परिघातील भूगर्भातील पाण्याचे सर्वेषण करावे. पावसाच्या पाण्याचा पुर्नवापर करण्यात यावा.

प्रकल्पातव्दारे परिसरातील गावांमध्ये वृक्षारोपण करावे.परिसरातील रस्त्याच्या दोन्ही बाजूस हरित पट्टा, झाडे विकसित करण्यात यावीत. त्यामुळे धुळीच्या प्रदूषणापासून संरक्षण मिळेल. प्रकल्प परिसरातील गावांमध्ये हरित पट्टा विकसित करताना फळझाडे आणि औषधी वनस्पती अधिक प्रमाणात लावण्यात यावीत. स्थानिक युवक व युवतींना रोजगार मिळण्याकरीता त्यांना सक्षम करण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम हाती घेण्याची सूचना केली. त्यामुळे स्थानिकांना आपल्या प्रकल्पात किंवा इतर ठिकाणी रोजगाराची संधी मिळेल.

श्री रेड्डी यांनी सूचना केली सीएसआर योजना राबविण्यासाठी समन्वय समितीची स्थापना करण्यात यावी त्यात कंपनीचे अधिकारी, प्रशासनातील अधिकारी, स्थानिक

लोकप्रतिनिधी यांचा समावेश करण्यात यावा. त्यामुळे विश्वासाहर्ता वाढेल. त्याचप्रमाणे स्थानिक लोकांना आवश्यक व गरज असणा-या गोष्टीच विकसित करण्यात याव्यात त्यांनी सूचना केली की विशिष्ट कालावधीनंतर आरोग्य शिबिर आयोजित करण्यात यावे, दुर्बल घटकांसाठी ग्रामीण क्षेत्रात प्राथमिक शिक्षणाला प्रोत्साहन दयावे.

पर्यावरण सल्लागार यांनी श्री. रेड्डी यांच्या सूचना आमलात आण्याचे सुचीत करुन की प्रकल्पाकडे २० एकर जागा असून त्यातील ४.६ एकर हरितपट्टा विकसित करण्यात येईल.

**४) श्री. ए. सुदर्शन, पर्यावरण कार्यकर्ता, चेयुथा रुरल एण्ड एन्व्हॉरमेंट डेव्लपमेंट सोसायटी, वाडापट्टी, धर्मस्थला, नालगोंडा जिल्हा, तेलंगणा राज्यः-**

त्यांनी सांगितले की पर्यावरणाची हानी न होता प्रकल्प कार्यान्वित करण्यात यावा. झाडे लावून त्यांचे संवर्धन करण्यात यावे. स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात यावे. प्रकल्पात बालमजुर ठेवण्यात येऊ नये. प्रकल्पातील व आजूबाजूच्या लोकांसाठी आरोग्य शिबिर घेण्यात यावे. त्यांनी प्रकल्पास पाठिंबा दर्शिवला.

प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की श्री सुर्दशन यांनी केलेल्या सूचनां पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**५) श्री. कृष्णमूर्ती, हैद्राबाद,एनजीओः-**

त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना सूचना केली की व्यवस्थापनाने प्रकल्प बाधित क्षेत्रात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. त्याचप्रमाणे वैदकीय सुविधा, कामगारांच्या कुटुंबियांना हेल्थ कार्ड प्रदान करण्यात यावे. कामगारांना सुरक्षतीच्या द्दष्टिकोनातून सर्व साहित्य पुरवण्यात यावे. प्रकल्पाच्या फायद्यातून ५-१०% निधी समुदाय विकासासाठी (Community Development) खर्च करण्यात यावा. मी सदरहू प्रकल्पाचे समर्थन करत असून पर्यावरण, वने मंत्रालयास पर्यावरण अनुमती प्रदान करण्याची शिफारस करत आहे.

प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पाच्या फायदाच्या ५% निधी सामाजिक विकासासाठी खर्च करण्याबाबत पर्यावरण मंत्रालयाच्या निर्देशांप्रमाणे कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी उपक्रम राबवविणार आहोत.

**६) श्री. एच.मधुबाबू, सामाजीक पर्यावरण कार्यकर्ता, रुरल एनव्हायरमेंट एज्युकेशन एन्ड हेल्थ अवरनेस सोसायटी, हैद्राबादः-**

श्री एच. मधुबाबू यांनी विचारणा केले की प्रकल्पात उत्पादन सुरु झाल्यावर वासाची दुर्गंधी टाळण्यासाठी कोणत्या उपाययोजना अंमलात आणण्यात येतील?

प्रकल्प सल्लागार यांनी उत्तर देताना सांगितले की हा प्रकल्प मोलॅसिस आधारित आसवणी प्रकल्प नाही. त्यामुळे येथे वासाची दुर्गंधी येणार नाही. हा आसवणी प्रकल्प धान्यावर आधारित असून धान्यावर (सुका कच्चा माल) Close Loop मध्ये प्रक्रिया करण्यात येणार आहे, त्यामुळे वासाची दुर्गंधी येनार नाही. हवा प्रदूषण नियंत्रणासाठी ईएसपी बसविण्यात येणार असल्यामुळे हवेचे प्रदूषण होणार नाही.

अध्यक्ष, पर्यावरण जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक काही सूचना, टीकाटिप्पणी वा आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणाताही प्रतिसाद नव्हता.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरण जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आजच्या कॅपोविटेझ प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. इ-१/५अ, १/५ब, बारामती औद्योगिक क्षेत्र, तांदुळवाडी, तालुका-बारामती, जिल्हा-पुणे, महाराष्ट्र या प्रस्तावित आसवणी प्रकल्पाच्या जनसुनावणीत सात तोंडी सूचना (सहा व्यक्ती, एकाने दोनदा सूचना केल्या) आणि तीन लेखी स्वरुपात सूचना प्राप्त झालेल्या आहेत. या बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल आणि त्यासोबत प्राप्त झालेल्या लेखी सूचना महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुख्यालयातर्फे सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल. त्यांनी म.प्र.नि.मंडळातील सर्व अधिकारी, कर्मचारी, प्रकल्प अधिकारी, पत्रकार, पर्यावरणवादी यांचे आभार मानले आणि बैठक संपन्न् झाल्याचे घोषत केले.

**(प्रताप जगताप)**
समन्वयक, पर्यावरणविषयक
जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
पुणे-१,म.प्र.नि.मंडळ, पुणे

**(नितिन शिंदे)**
सदस्य, पर्यावरणविषयक
जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ, पुणे

**(हिम्मत खराडे)**
अध्यक्ष, पर्यावरणविषयक
जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे
जिल्हा-पुणे